रे. मु. क्र. ०१/२००८
**(CNR No.MHAK070000112008)**

: **निशाणी ८३ वर आदेश** :

१. प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज अधिकचा जबाब अभिलेखावर दाखल करण्यास झालेल्या विलंबास माफी मिळण्याकरिता तसेच अधिकचा जबाब अभिलेखावर दाखल करण्यास परवानगी मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे कथन असे की, वादीने घोषणा, ताबा व कायमचा हुकुम मिळणेकरिता प्रस्तुत दावा त्याचेविरुध्द दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात माननीय जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, अकोला यांच्या आदेशान्वये दुरुस्ती करण्यात आली. सदर दुरुस्ती नंतर प्रतिवादीला त्यांच्या जबाबाव्यतिरिक्त अधिकचा जबाब देणे भाग आहे. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव प्रतिवादी वेळेच्या आंत अधिकचा जबाब दाखल करु शकले नाही. प्रतिवादीचे वय ६७ वर्षाचे आहे व त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते वकीलांशी संपर्क करु शकले नाही व त्यामुळे अभिलेखावर अधिकचा जबाब दाखल करु शकले नाही. प्रतिवादीला त्यांचा अधिकचा जबाब दाखल करणे महत्वाचे आहे कारण त्यांचे महत्वाचे अधिकार व हितसंबंध सदर दाव्याशी आहे. त्यामुळे प्रतिवादीस अधिकचा जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा तसेच जबाब दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी. सदर जबाब दाखल करण्यास परवानगी दिली नाही तर प्रतिवादीचे नुकसान होईल उलटपक्षी वादीचे कोणत्याही प्रकारे नुकसार होणार नाही. करिता प्रस्तुत अर्ज.

३. वादीने प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे नि. ८७ वर दाखल केले. त्यांनी नमुद केले की, प्रतिवादीने अर्जात नमुद केलेली कारणे ही संयुक्तीक नाही. वि. न्यायालयाने दावामिळकतीच्या मोजणीचा आदेश केला त्यावेळी प्रतिवादी त्याकरिता जातीने हजर होते त्यामुळे ते वयोवृध्द असल्याने हजर होवू शकले नाही व अधिकचा जबाब दाखल करु शकले नाही हे कारण संयुक्तिक नाही. प्रतिवादीने झालेल्या उशीराचे स्पष्टीकरणही व्यवस्थित रित्या नमुद केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा. प्रतिवादीचे अर्जातील संपुर्ण कथन त्यांनी नाकबुल केले की सदर अर्ज हा योग्यतेचा नाही व तो खर्चासह खारीज करण्यात यावा. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रतिवादी व वादीची कथने वाचली, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला यांच्या आदेशाने प्रस्तुत प्रकरण या न्यायालयात रिमांड करण्यात आले व त्यातील आदेशान्वये वादीने दाव्यात दुरुस्ती केली. त्या अनुषंगाने प्रतिवादीला त्यांच्या जबाबात पुरवणी जबाब देणे आवश्यक झाले आहे. परंतु प्रतिवादीचे वयोमान तसेच प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते अधिकचा जबाब दाखल करु शकले नाही. प्रतिवादीचे सदर कारण हे संयुक्तिक असल्याचे दिसुन येते. प्रतिवादीने वेळेच्या आंत अधिकचा जबाब दाखल केला नसला तरी आता विलंबास माफी मागुन जबाब दाखल करण्यास ते तयार आहे. तशी परवानगी दिल्यास प्रस्तुतच्या दाव्यातील मुळ वादाचे समुळ निराकरण गुणावगुणांवर होईल. त्यामुळे प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

## : आ दे श :

१. अर्ज प्रतिवादीने वादीला रुपये ५००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. खर्च दिल्यावर प्रतिवादीला अधिकचा जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येते व अधिकचा जबाब दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च अर्जदाराने सोसावा.

सही/-
(चं. प्र. रघुवंशी)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर

बाळापूर.
दिनांक : ०७.०२.२०१९.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S.V. Indane. |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 07/02/2019. |
| Signed by Presiding Officer on | : | 07/02/2019. |
| Uploaded on | : | 07/02/2019. |

-------------------------------------------------------------------------------------------